महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ०१ /२०२२ दि. ३/०१/२०२२

## –:वाहतुक नियंत्रण अधिसूचना:–

**ज्याअर्थी**, कोपरी वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील कोपरी ब्रिज येथे नवीन ब्रिज सुरू झाल्याने सध्या जुना कोपरी रेल्वे ब्रिज फेज–२ चे काम सुरू करण्यात येणार आहे. सदर कामाचे दरम्यान जुना कोपरी ब्रिज बंद करून त्याचे जागेवर नव्याने ब्रिज उभारणी करण्यात येणार आहे. सदर ब्रिजचे काम सुरू करण्याकरीता जुना ब्रिज बंद करून सर्व वाहतूक नव्या ब्रिजने वळतिण्यात येणार आहे.

**त्याअर्थी**, मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, ठाणे शहर म्हणून मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद** – नाशिक ते मुंबई तथा मुंबई ते नाशिक मार्गावरील नवीन कोपरी ब्रिजवर दोन चाकी व तीनचाकी वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग--** नाशिक कडुन मुंबई कडे जाणारी दोन चाकी व तीन चाकी वाहने भास्कर कॉलनी कट येथुन जुना कोपरी रेल्वे पुलावरून– हरिओम नगर मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच मुंबई कडुन नाशिक कडे जाणारी दुचाकी व तीन चाकी वाहने हरिओम नगर मार्गे कोपरी सर्कल कोपरी रेल्वे ब्रिज मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** मुंबई कडून नाशिक कडे आणि नाशिक कडुन मुंबई कडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना जुना कोपरी ब्रिज येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने नवीन कोपरी पुलाचा वापर करतील.

सदरची वाहतूक अधिसूचना ही दि. ०४/०१/२०२२ रोजी रात्री ०७:०० पासुन जुन्या कोपरी ब्रिजचे काम पुर्ण होईपर्यंत लागू करण्यात येत आहे.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर/बृहन्मुंबई/नवी मुंबई
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

पोलीस उप आयुक्त,
आ.गु.शा. व सायबर सेल, ठाणे
आवक क्रमांक : ०४/२२.
दिनांक : ०४/०१/२०२२

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मबंई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे